MHOS120002982024

**नियमित दिवाणी दावा/212/2024**
**अमोल सुरेश निरफळ वि.उत्रेश्वर गोविंद निरफळ**

**निशाणी क्र.२४ वरील आदेश**

वादीने प्रस्तुतचा अर्ज उप अधिक्षक भूमी अभिलेख भूम यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक होऊन त्यांनी दावा मिळकतीची मोजणी करावी, हद्दीच्या खुणा कायम कराव्यात व मोजणीचा अहवाल नकाशासह दाखल करावा अशा आदेशासाठी दाखल केला आहे.

२. वादीचे कथन की, मौजे पन्हाळवाडी ता. भूम येथील गट क्र.१२५ क्षेत्र १हे–७७आर पैकी वादी क्र.१ च्या नावे असलेले १हे–७आर क्षेत्र व वादी क्र.२ च्या नावे असलेले ४०आर क्षेत्र असे एकुण क्षेत्र १हे–४७आर क्षेत्राची चतु:सिमा पुर्वेस गट क्र.१२५ मधील प्रतिवादी क्र.१ ची जमिन, पश्चिमेस गट क्र.१२३ मधील प्रतिवादी क्र.६ ची जमिन, दक्षिणेस प्रतिवादी क्र.११ ची गट क्र.१२४ मधील जमिन व उत्तरेस रस्ता ही वादींची मालकी व वहिवाटीची जमिन असुन प्रतिवादी क्र.१, ६ व ११ हे दावा जमिनीचे बांध फोडुन अतिक्रमण करत आहेत. वादींनी प्रतिवादीकडे दावा मिळकतीची मोजणी करून हद्दीच्या खुणा कायम करण्यासाठी मागणी केली असता त्यांनी ती नाकारली. त्यामुळे वादीस प्रस्तुतचा दावा मिळकतीच्या, मालकी हक्काच्या जाहिरनाम्यासाठी, निरंतर मनाई आदेशासाठी व मोजणी करून हद्दीच्या खुणा कायम करण्यासाठी दाखल करणे भाग पडले. सदरच्या दावामिळकतीची मोजणी होऊन हद्दीच्या खुणा कायम झाल्यास वाद संपुष्टात येईल. त्यामुळे अर्ज मागणीप्रमाणे मंजुर करावा अशी वादीची विनंती आहे.

३. प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी म्हणणे देऊन अर्ज आव्हानित केला. एकत्रीकरण योजनेत क्षेत्राची फोड व्यवस्थित न झाल्याने वादी व प्रतिवादी यांच्यामध्ये एकत्रीकरण कार्यालयामध्ये वाद चालु आहेत व प्रकरण जिल्हा अधिक्षक भूमी अभिलेख कार्यालयात मोजणी करीता न्यायप्रविष्ठ असल्याने हा अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती प्रतिवादी क्र.६ ते ८ यांनी केली आहे.

४.	प्रतिवादीतर्फे युक्तीवाद ऐकला. वादी गैरहजर, युक्तीवाद करण्यात आलेला नाही. मी दाव्याचे अवलोकन केले. वादी हे दावामिळकतीचे मालक व कब्जेवहिवाटदार आहेत अशा जाहिरनाम्यासाठी, निरंतर ताकीद आदेशासाठी व दावामिळकतीची मोजणी होऊन हद्दीच्या खुणा कायम करण्यासाठी दाखल केला आहे. दावा व प्रस्तुतच्या अर्जात प्रतिवादी हे वादीच्या दावामिळकतीतील बांध कोरून अतिक्रमण करत आहेत असे कथन घेऊन वादी हा न्यायालयासमोर आला असल्याने विवाद्य मुद्दयांचे कायमस्वरुपी निराकरण करण्यासाठी न्यायालयीन आयुक्त यांची वादीच्या मागणीप्रमाणे नियुक्ती केल्यास प्रतिवादींना कोणतीही तोशिस लागणार नाही. त्यामुळे न्यायाच्या व हिताच्या दृष्टीकोनातुन प्रस्तुतचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे या निष्कर्षाप्रत मी आले असल्याने मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे;

**<u>आ दे श</u>**

**१.** अर्ज मागणीप्रमाणे मंजुर करण्यात येतो.

**२.** तालुका निरिक्षक भूमी अभिलेख भूम यांची न्यायालयीन आयुक्त म्हणुन नेमणुक करण्यात येते.

**३.** न्यायालयीन आयुक्त यांनी कायदेशीर प्रक्रियेचा अवलंब करून संबंधीतांना नोटिसा पाठवुन दावामिळकत मौजे पन्हाळवाडी, ता. भूम येथील गट क्र.१२५ मधील वादी क्र.१ व २ यांच्या मालकीचे १हे–४७आर जमिनीची मोजणी करुन हद्दीच्या खुणा दर्शवुन तसेच अतिक्रमण असल्यास ते मोजमापासह दर्शवुना, अतिक्रमण कोणी केले आहे याचा नकाशासह अहवाल आजपासुन ३ महिन्यांच्या आत सादर करावा.

**४.** वादीने मोजणीचा खर्च जमा करावा.

**५.** येणेप्रमाणे मोजणी पत्र पाठविण्यात यावे.

(आदेश खुल्या न्यायालयात पारित व घोषित करण्यात आला)

PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Digitally signed by PRATIBHA PRABHAKAR KHAPE
Date: 2026.03.18 11:02:19 +0530

दिनांक – १७.०३.२०२६

**(श्रीमती पी.एस.जाधव)**

२रे सह दिवाणी न्यायाधीश व.स्तर, भूम.

# <u>CERTIFICATE</u>

I affirm that, the contents of this P.D.F. file Judgment are same, word to word, as per the original Judgment.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | ... | S. S. Hingmire<br>Stenographer Grade-III |
| Court | ... | 2nd Jt. Civil Court Sr. Dn., Bhoom. |
| Date | ... | 17.03.2026 |
| Order signed by Presiding Officer on | ... | 17.03.2026 |
| Order uploaded on | ... | 18.03.2026 |